# मिरा भाईंदर महानगरपालिका

// पाणी पुरवठा व मलनि:सारण विभाग //

प्रशासकीय ठराव दिनांक १२ / ०२ /२०२४

विषय क्र. (३७५) : **महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 129 (1) (अअ) नुसार "पाणी पुरवठा लाभ कर" लागू करणेस मंजूरी मिळणेबाबत. (पाणी पुरवठा व मलनि:सारण विभाग)**

## कार्यलयीन प्रस्तावना

मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्राचा विकास झपाटयाने होत आहे. त्यामुळे पाणी पुरवठयासारख्या अत्यावश्यक सेवेवरती ताण येत आहे. वाढत्या विकासामुळे पाणी पुरवठा अपुरा पडत आहे. सदर विकसीत होणाऱ्या भागास पाणी पुरवठा सोई व सुविधा देणे करीता महानगरपालिके कडून प्रकल्प हाती घ्यावे लागतात व सदरचे प्रकल्प हाती घेणे करीता महानगरपालिकेस कर्ज स्वरुपात निधी जमा करणे गरजेचे असते व सदर प्रकल्पाकरीता घेण्यात येणाऱ्या कर्ज स्वरुपातील निधिची परतफेड वेळोवेळी होणे आवश्यक आहे.

भविष्यातील सन 2051 पर्यंतची पाण्याची मागणी पूर्ण होणेसाठी शासनाने सुर्या धरण प्रकल्पातुन मिरा-भाईंदर शहरासाठी 218 द.ल.लि. पाण्याचे आरक्षण मंजूर केलेले आहे. सदरचे 218 द.ल.लि. पाणी मिरा-भाईंदर शहरापर्यंत पोहचविण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण मिरा-भाईंदर व वसई-विरार महानगरपालिकेसाठी 403 द.ल.लि. पाणी पुरवठा योजना राबवीत आहे. या योजने अतंर्गत चेणे येथील संतुलन टाकीत प्राप्त होणारे 218 द.ल.लि. पाणी पुढे मिरा-भाईदर शहरात आणणे, शहराअंतर्गत वितरण व्यवस्था अंथरणे व उंच जलकुंभ बांधणे इत्यादी अनुषंगीक कामे ही मिरा-भाईंदर महानगपालिकेमार्फत करावयाची आहेत. सदर योजना पूर्ण झाल्यानंतर मिरा-भाईंदर शहराचा पाणी टंचाईचा प्रश्न कायमस्वरुपी सुटणार आहे.

सदर कामाचा रु.516.77 कोटी किंमतीचा सविस्तर प्रकल्प अहवाल केंद्र पुरस्कृत अमृत 2.0 अभियानातंर्गत प्रशासकिय मंजूरीसाठी व निधी उपलब्धतेसाठी सादर करण्यात आला आहे. सदर प्रकल्पास शासन निर्णय अमृत-2022/प्र. क्र.268/नवि-33 मुंबई दि.02/11/2022 रोजी मान्यता प्राप्त आहे. सदर कामाची निविदा प्रक्रिया पुर्ण झाली असुन मे. इगल इन्फ्रा इंडिया लि. या कंपनीस कार्यादेश देण्यात आलेले आहेत. सदर प्रकल्पाकरीता एकूण प्रकल्प किंमतीच्या 30% निधी रु.155.04 कोटी व स्विकृत निविदेनुसार योजनेच्या मंजूर किंमतीपेक्षा येणारी जादाची रक्कम रु.59.37 कोटी असा एकूण रु.214.41 कोटी स्वनिधी महानगरपालिकेला उभारावा लागणार असल्याने या भांडवली खर्चाची व्यवस्था करावी लागणार आहे. महानगरपालिकेचे उत्पन्न वाढ झाल्यास कर्ज घेण्याची क्षमता देखील वाढेल व त्यानुसार आवश्यक कर्ज निधी प्राप्त होउ शकेल. सदर बाब विचारात घेता "पाणी पुरवठा लाभ कर" लावणे आवश्यक आहे.

सन 2022-23 वर्षातील कामांवर होणारा खर्च व उत्पन्न याबाबत खालील प्रमाणे माहिती सादर करण्यात येत आहे.

साक्षांकित प्रत

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

| | | |
|---|---|---|
| 1. | पाणीपुरवठयाच्या स्त्रोत्रापासुन ते रहिवाशांच्या घरापर्यंत पाणी पोहचविणे चा एकत्रित देखभाल, दुरुस्ती संचलन खर्च | रु.30,00,80,449/- |
| 2. | पाणीबीलाचा खर्च (स्टेम/एम.आय.डी.सी,बीएमसी) | रु.69,94,91,034/- |
| 3. | स्थायी मनपा कर्मचारी / अधिकारी वेतन | रु.7,12,30,000/- |
| 4. | वार्षिक खर्च | रु.107,08,01,483/- |
| 5. | पाणी विक्री वार्षिक उत्पन्न | रु.87,02,43,411/- |

या शिवाय सदर विभागातील अमृत-2 मधील नविन वाढीव पाणीपुरवठा योजनेवरील मनपा हिस्सा स्वतंत्र रित्या मनपा निधीतुन शासन अनुदान वित्त आयोग या मधुन खर्च करण्यात येणार आहे.

सद्यस्थितीत वरील जमा व खर्च पहाता वितरण व्यवस्थेत महानगरपालिकेच्या निधीतुन रु.20,05,58,072/- (अक्षरी रुपये वीस कोटी पाच लक्ष अठ्ठावन हजार बहात्तर मात्र) एवढा खर्च होत आहे. त्यामुळे "पाणी पुरवठा लाभ कर" लावणे आवश्यक आहे.

पाणी पुरवठयाच्या सुविधा पुरविण्यासाठी आणि त्यात सुधारणा करण्यासाठी भांडवली कामांवर केलेल्या किंवा करावयाचा संपुर्ण खर्च किंवा त्याचा काही भाग भागविण्यासाठी महानगरपालिकेला आवश्यक वाटेल एवढया त्या कामांच्या कर योग्य मुल्यांच्या टक्केवारीने आकारावयाची "पाणी पुरवठा लाभ कर" या नावाने ओळखली जाणारी अतिरीक्त पाणीपट्टी महाराष्ट्र प्रांतिक अधिनियमचे कलम 129 (1) (अअ) नुसार आकरणे शक्य आहे व हा कर लागू करण्याचा अधिकार महानगरपालिकेस आहे. तरी उक्त तरतुदीनुसार निवासी वापराकरीता 10% व अनिवासी वापराकरीता 15% पाणी पुरवठा कर लागु केल्यास या कराच्या रुपाने महानगरपालिकेस वाढीव उत्पन्न मिळू शकेल.

दि.27/12/2022 रोजीच्या पत्रान्वये सह.आयुक्त नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांनी नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाची आर्थिक स्थिती मजबूत करण्यासाठी सदर उत्पन्न स्तोत्रा मध्ये वाढ करणे आवश्यक आहे. 15 व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार मालमत्ता कराच्या उत्पन्नात वाढ करणे बाबत सुचवण्यात आले आहे. पंधरावा वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार अनुदान प्राप्त करुन घेण्यासाठी विविध अटी व शर्ती निर्धारित केल्या आहेत. यामध्ये उत्पनात वाढ करणे ही प्रमुख शिफारस आणि अट निर्धारीत करण्यात आली आहे.

सन 2023-24 वर्षाकरीता कर योग्य मुल्य (Ratable Value) निवासी वापराकरीता रु.185.14 कोटी व अनिवासी वापराकरीता रु.89.26 कोटी इतकी आहे. निवासी वापराकरीता 10% व अनिवासी वापराकरीता 15% "पाणी पुरवठा लाभ कर" लागु केल्यास या कराच्या रुपाने महानगरपालिकेस सुमारे रु.31.90 कोटी इतके वाढीव उत्पन्न मिळू शकेल.

राज्यातील इतर महानगरपालिका जसे ठाणे महानगरपालिकेत कर योग्य मुल्याच्या निवासी वापराकरीता 17% व अनिवासी वापराकरीता 22% तसेच कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेत निवासी व अनिवासी वापरा करीता 12.50 % "पाणी पुरवठा लाभ कर" आकारण्यात येत आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम 129(1)(अअ) नुसार "पाणी पुरवठा लाभ कर" लावण्याची तरतुद असून तरतूदीनुसार "पाणी पुरवठा लाभ कर" लागू करण्याचा अधिकार महानगरपालिकेस आहे. राज्यातील इतर महानगरपालिकांनी देखिल सदर कर लागु केलेला आहे. उक्त तरतुदी नुसार निवासी वापराकरीता 10% व अनिवासी वापराकरीता 15% "पाणी पुरवठा लाभ कर" लागु केल्यास या कराच्या रुपाने महानगरपालिकेस सुमारे रु.31.90 कोटी इतके वाढीव उत्पन्न मिळू शकेल व येणाऱ्या उत्पन्नातुन पाणी पुरवठा योजना सारखे प्रकल्प मार्गी

साक्षांकित प्रत

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

लावणे शक्य होईल. सन 2024-25 पासून करयोग्य मुल्याच्या (Ratable Value) निवासी वापराकरीता 10% व अनिवासी वापराकरीता 15% "पाणी पुरवठा लाभ कर" लागू करणे आवश्यक आहे.

सदर "पाणी पुरवठा लाभ कर" लागू करणेस प्रशासकिय ठरावाव्दारे मान्यता देण्याचा प्रस्ताव प्रशासनाने सादर केला आहे.

**प्रशासकिय ठराव क्र. ३०५ दि. १२/ ०२ /2024**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतूदी व विशेषत : कलम 452 (अ) च्या (1अ) व (1ब) नुसार महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील शासन आदेश क्र. एमसीओ 2020/प्र.क्र.71 (भाग-2) नवि-14 दि.26 ऑगस्ट 2022 अन्वये प्राप्त अधिकारानुसार मी. श्री. संजय काटकर, प्रशासक, मिरा-भाईंदर महानगरपालिका, मा. महानगरपालिका महासभेच्या अधिकाराचा वापर करुन प्रशासनाने सादर केलेल्या विषयास अनुसरुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम 129(1)(अअ) नुसार "पाणी पुरवठा लाभ कर" लावण्याची तरतुद असून तरतूदीनुसार "पाणी पुरवठा लाभ कर" लागू करण्याचा अधिकार महानगरपालिकेस आहे. राज्यातील इतर महानगरपालिकांनी देखिल सदर कर लागु केलेला आहे. उक्त तरतुदी नुसार निवासी वापराकरीता 10% व अनिवासी वापराकरीता 15% "पाणी पुरवठा लाभ कर" लागु केल्यास या कराच्या रुपाने महानगरपालिकेस सुमारे रु.31.90 कोटी इतके वाढीव उत्पन्न मिळू शकेल व येणाऱ्या उत्पन्नातुन पाणी पुरवठा योजना सारखे प्रकल्प मार्गी लावणे शक्य होईल. सन 2024-25 पासून करयोग्य मुल्याच्या (Ratable Value) निवासी वापराकरीता 10% व अनिवासी वापराकरीता 15% "पाणी पुरवठा लाभ कर" लागू करणाच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

वरील "पाणी पुरवठा लाभ कर" लागू करणाच्या पारित ठरावानुसार पाणी पुरवठा व मलनिसारण विभागाने व मालमत्ता कर विभागाने नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सही/-

**(संजय श्रीपतराव काटकर, भाप्रसे)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

साक्षांकित प्रत

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

**प्रत :- 1. पाणी पुरवठा व मलनिसारण विभाग**
**2. मालमत्ता कर विभाग**